सहा.मतदार नोंदणी अधिकारी, १४१उल्हासनगर विधानसभा मतदार संघ यांचे कार्यालय
कार्यालयाचा पत्ता : - तहसिलदार कार्यालय, गांधी रोड उल्हासनगर-४२१००५
दुरध्वनी क्रमांक :- ०२५१-२५३०५७ ई- मेल :- १४१ulhasnagar@gmail.com

क्र.निवडणूक/कक्ष-१/ टे-१/कावी- ०७/२३ दिनांक- १०/०७/२०२३

**निवडणूक बैठक**

प्रति,

१ अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, उल्हासनगर शहर
२ अध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी, उल्हासनगर शहर
३ अध्यक्ष, ऑल इंडिया तृणमुल कॉंग्रेस, उल्हासनगर शहर
४ अध्यक्ष, भारतीय कम्युनिष्ट पार्टी, उल्हासनगर शहर
५ अध्यक्ष, भारतीय कम्युनिष्ट पार्टी, (मार्क्सवादी) उल्हासनगर शहर
६ अध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, उल्हासनगर शहर
७ अध्यक्ष, बहुजन समाज पार्टी, उल्हासनगर शहर
८ अध्यक्ष, बाळासाहेबांची शिवसेना, उल्हासनगर शहर
९ अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, उल्हासनगर शहर
१० अध्यक्ष, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे), उल्हासनगर शहर
११ अध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, उल्हासनगर शहर
१२ अध्यक्ष, आम आदमी पार्टी, उल्हासनगर शहर
१३ अध्यक्ष, आर पी आय, उल्हासनगर शहर
१४ अध्यक्ष , समाजवादी पार्टी , उल्हासनगर शहर
१५ अध्यक्ष , प्रजा कृपा पार्टी , उल्हासनगर शहर

विषय :- दि.१.०१.२०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाबाबत- राजकीय पक्षाची बैठक.
संदर्भ :- १. मा.भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.२३/२०२३-ERS(Vol-III) ,दि.२९ मे २०२३
२. मा. मुख्य निवडणूक अधिकारी ,महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.ईएलआर २०२३/प्र.क.३६८/२३/३३ दि.१५/०६/२०२३.

राज्यात आगामी वर्षाच्या ०१ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीची विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम सर्वसाधारणपणे चालु वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत करण्यात येतो जेणेकरून आगामी वर्षाच्या जानेवारीच्या पहिल्या आठवडयात मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करण्यात येते. लोकप्रतिनिधित्व अधिनियम , १९५० च्या नियम १४ मधील तरतुदीनुसार , चार अर्हता दिनांक ( १ जानेवारी, १ एप्रिल , १ जुलै आणि १ ऑक्टोबर ) उपलब्ध आहेत आणि त्यामुळे आगामी वर्षाच्या १ जानेवारी या अर्हता दिनांकावर वार्षिक पुनरिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. त्याबरोबर आगामी वर्षातील पुढील १ एप्रिल , १ जुलै आणि १ ऑक्टोबर हे तीन अर्हता दिनांकावर आधारीत आगाऊ अर्ज स्विकारण्यात येत आहेत. त्यासंदर्भातील सविस्तर सूचना भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. २३/INST/२०२२-

ERS, दिनांक १२ जुलै ,२०२२ आणि पत्र क्रमांक २३/INST/२०२२-ERS, दिनांक १६ मार्च, २०२३ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. सदर सुचनांचे अनुपालन करावे.

२ संदर्भिय पत्रान्वये दिनांक ०१ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीची विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषित केला आहे. राष्ट्रीय मतदार दिवस (२५ जानेवारी ) या दिनी नव मतदारांचे (१८ ते १९ वर्षातील ) मतदार ओळखपत्र छापून त्यांना वाटप करता यावे या अनुषंगाने मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी करण्यात येत आहे.

३ सदर पुनरीक्षण कार्यक्रमाचे प्रामुख्याने दोन भाग आहेत. पुनरिक्षण-पुर्व उपक्रम आणि पुनरिक्षण उपक्रम मतदार यादीची गुणवत्ता उच्च राखण्यासाठी पुनरिक्षण-पुर्व उपक्रमास देखील पुनरीक्षण उपक्रमाइतकेच महत्त्व आहे. सदर पुनरीक्षण कार्यक्रमाचे सविस्तर वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उपक्रम | कालावधी |
|---|---|---|
| **पुनरिक्षण-पुर्व उपक्रम** | | |
| १. | मतदार यादी संदर्भातील सर्व कायदे आणि मार्गदर्शक सुचना तसेच, नविनतम IT Application आणि प्रणालीबाबत मतदार नोंदणी अधिकारी/ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी /मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना प्रशिक्षण | दि. ०१ जुन , २०२३ (गुरूवार) ते दि. २०जुलै ,२०२३ (गुरूवार) |
| २. | **I. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेद्वारे प्रत्यक्ष घरोघरी भेट देऊन पडताळणी** | दि. २१जुलै , २०२३ (शुक्रवार) ते दि. २१ ऑगस्ट,२०२३ (सोमवार) |
| | II. मतदान केंद्राचे सूसूत्रीकरण व प्रमाणीकरण<br>iii. मतदार यादी/ मतदार ओळखपत्रातील त्रुटी दुर करणे इ.<br>iv. आयोगाच्या मानकानुसार छायाचित्र प्राप्त करुन मतदार यादीत सुधारणा करणे. तसेच, अस्पष्ट/ अंधुक छायाचित्र बदलुन त्याऐवजी संबंधित मतदाराकडून योग्य दर्जाची छायाचित्र प्राप्त करुन मतदार यादीत सुधारणा करणे.<br>V. विभाग/भाग यांची आवश्यकतेनुसार नव्याने मांडणी करून मतदान केंद्राच्या यादीस मान्यता घेणे, आणि<br>vi. तुलनात्मक फरक शोधुन फरक दुर करण्यासाठी कालबद्ध योजना आखणे.<br>Vii. कंट्रोल टेबल अद्यावत करणे | दि. २२ ऑगस्ट , २०२३ (मंगळवार) ते दि. २९ सप्टेंबर, २०२३ (शुक्रवार) |
| ३. | i. नमुना १-८ तयार करणे<br>ii. ०१ जानेवारी ,२०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत पुरवणी व एकत्रीत प्रारुप यादी तयार करणे | दि. ३० सप्टेंबर, २०२३ (शनिवार ) ते दि. १६ ऑक्टोबर, २०२३ (सोमवार) |
| पुनरिक्षण उपक्रम | | |
| ४. | एकत्रित प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करणे | दि. १७ ऑक्टोबर, २०२३ (मंगळवार) |
| ५ . | दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी | दि. १७ ऑक्टोबर, २०२३ (मंगळवार) ते |

| | | |
|---|---|---|
| ६. | विशेष मोहिमांचा कालावधी | दि. ३० नोव्हेंबर, २०२३ (गुरूवार) दावे व हरकती स्विकारण्याच्या कालावधीत, मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी निश्चित केलेले दोन शनिवार व रविवार |
| ७. | दावे व हरकती निकालात काढणे. | दि. २६ डिसेंबर, २०२३ (मंगळवार) पर्यंत |
| ८. | I. अंतिम प्रसिध्दीसाठी आयोगाची परवानगी मागणे.<br>II. डाटाबेस अद्यावत करणे आणि पुरवणी यादीची छपाई | दि. ०१ जानेवारी, २०२४ (सोमवार) पर्यंत |
| ९. | मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी करणे. | दि. ०५ जानेवारी, २०२४ (शुक्रवार) |

वरील नमुद कार्यक्रमाचे अनुषंगाने या मतदार संघात मा. भारत निवडणूक आयोगाकडील पत्रात नमुद केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करणे व निर्धारित केलेल्या कार्यक्रमानुसार विहित कालावधीत कार्यवाही करावयाची असल्याने या तालुक्यातील सर्व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची दि. **१४/०७/२०२३ रोजी दुपारी १२.३०** वाजता तहसिलदार उल्हासनगर यांचे दालनात बैठक आयोजित केलेली आहे. तरी सदर बैठकीस आपण उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

सहा. मतदार नोंदणी अधिकारी
**सहा. मतदार नोंदणी अधिकारी**
**१४१-उल्हासनगर विधानसभा मतदार संघ तथा**
**तहसिलदार उल्हासनगर**

**प्रत:- १. मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे, यांना माहितीस्तव सविनय सादर.**
**२. मा. मतदार नोंदणी अधिकारी, १४१ उल्हासनगर विधानसभा मतदार संघ यांना माहितीस्तव सविनय सादर.**

**सहा. मतदार नोंदणी अधिकारी**
**१४१-उल्हासनगर विधानसभा मतदार संघ तथा**
**तहसिलदार उल्हासनगर**